**अल्पसंख्याकांच्या कल्याणसाठी मा.पंथप्रधानांचा १५ कलमी कार्यक्रम : समन्वय करणे**

मा. पंतप्रधानांच्या नवीन १५ कलमी कार्यक्रमाची मुख्य उद्दीष्टे खालीलप्रमाणे आहेत.

(क) अल्पसंख्याकांकरीता शिक्षणाच्या संधीमध्ये वाढ करणे.

(ख) आर्थिक कार्यक्रम आणि रोजगारांमध्ये समान वाटा उपलब्ध करून देणे.

(ग) अल्पसंख्याकांच्या राहाणीमानात सुधारणा घडवून आणणे.

(घ) सांप्रदयिक दंगलींना आळा घाळणे व त्यांचे नियंत्रण करणे.

**क) शिक्षणाच्या संधी वाढविणे :-**

**१. एकात्मिक बाल विकास सेवांची पुरेशी उपलब्धता :-**

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची उद्देश - उपेक्षित घटकातील मुले, गरोदर महिला/ दूध पाजणाऱ्या माता यांचा संपूर्ण विकास, अंगणवाडी केंद्राच्या माध्यमातून सेवा पुरविल्या जातात. जसे पोषण, आरोग्य तपासणी, लसीकरण, औपचारिक शिक्षण एकात्मिक बाल विकास सेवा आणि अंगणवाडी केंद्र, एका ठराविक संख्येत अल्पसंख्याक बहुल भाग/ गावात उघडते जातील, जेणे करून या योजनेचा लाभ अशा समुदायांना योग्य प्रमाणात मिळू शकेल.

**२. शालेय शिक्षणाच्या उपलब्धतेत सुधारणा करणे :-**

सर्व शिक्षा अभियान, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजना आणि अशा इतर सरकारी योजनांतर्गत, अशी विद्यालये एका ठराविक संख्येत अल्पसंख्याक समुदाय बहुल भागात/गावात स्थापन केली जावी.

**३. उर्दू शिक्षणासाठी अधिक साधने :-**

उर्दू शिकविण्यास प्रोत्साहन देण्यासाठी, या भाषेशी संबंधित किमान एक चतुर्थाश लोकसंख्या असलेल्या ठिकाणी प्राथमिक आणि उच्च प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळांतील उर्दू भाषेच्या शिक्षकांची भरती आणि नेमणूकीकरिता केंद्रीय मदत दिली जाईल.

**४. मदरसा शिक्षणाचे आधुनिकीकरण :-**

मदरशांमध्ये शिकत असलेल्या विविध वयोगटातील विद्यर्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पारंपारिक धार्मिक शिक्षणाबरोबर विज्ञान,गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दू या विषयांचे आधुनिक शिक्षण देण्यासाठी केंद्राच्या क्षेत्रीय सघन कार्यक्रमांतर्गत आणि राज्याच्या डॉ.झाकीर हुसेन मदरसा आधुनिकिकरण कार्यक्रम, यांमध्ये शैक्षणिकदृष्टया मागास अल्पसंख्याकांची जास्त लोकसंख्या असणाऱ्या क्षेत्रात पायाभूत शैक्षणिक सुविधा आणि मदरसा शिक्षणाच्या आधुनिकीकरणाची तरतूद आहे. ही गरज पूर्ण करण्याचे महत्त्व लक्षात घेऊन, हा कार्यक्रम पुरेशा प्रमाणात सुव्यवस्थित आणि प्रभावीपणे लागू करण्यात येईल.

**५. अल्पसंख्याक समाजातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्याकरिता शिष्यवृत्या :-**

अल्पसंख्याक समाजातील विद्यर्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व व मॅट्रिकोत्तर आणि मेरीट कम मिन्स शिष्यवृत्यांसाठीच्या योजना तयार करून राबविण्यसात येतील.

**६. मौलाना आझाद शिक्षण प्रतिष्ठानच्या माध्यमातून शैक्षणिक सरंचनेत सुधारणा करणे :-**

मौलाना आझाद शिक्षण प्रतिष्ठानाचे(एमएईएफ) बळकटीकरण करण्यासाठी आणि त्यांच्या कार्याचा अधिक प्रभावीपणे विस्तार करण्यासाठी, त्याला सक्षम बनविण्यसाकरिता शासन/ सरकार शक्य ते सर्व सहाय्य / मदत देईल.

**ख) आर्थिक कार्यक्रम आणि रोजगार यात समान भागीदारी**

**७. गरीबांसाठी स्वयंरोजगार व मजूरी रोजगार :-**

(क) ग्रामीण भागासाठी स्वर्णजयंती क्राम स्वयंरोजगार योजना (एसजीएसवाय) प्राथमिक स्वयंरोजगार कार्यक्रमाचे उद्देश आहेत. गरीब ग्रामीण कुटुंबाला दारिद्र्य रेषेच्या वर आणणे, बँक कर्ज आणि सरकारी मदतीतून हे काम करण्यात येते. या योजनेतंर्गत आर्थिक आणि भौतिक ध्येयाची निश्चित टक्केवारी दारिद्र्य रेषेखाली असलेल्या अल्पसंख्याक समुदायासाठी निर्धारित करण्यात येईल.

(ख) स्वर्णजंयती शहरी रोजगार योजनेचे(एसएसआरवाय) दोन मुख्य घटक आहेत. शहरी स्वयंरोजगार कार्यक्रम (युएसईपी) आणि शहरी मजूरी रोजगार कार्यक्रम (युडब्लुईपी) या कार्यक्रमांतर्गत आर्थिक ध्येयाची निश्चित टक्केवारी दारिद्र्य रेषेखाली असलेल्या अल्पसंख्याक समुदायातील लोकांना सुविधा देण्यासाठी निर्धारित करण्यात येईल.

(ग) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेचा हेतू आहे ग्रामीण भागात अतिरिक्त रोजगार उपलब्ध करून देणे आणि एका टिकाऊ समुदाय व सामाजिक, आर्थिक संरचनेची निर्मिती करणे, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कार्यक्रम (रा.ग्रा.रो.ह.का) २०० जिल्ह्यांमध्ये सुरु केला असला तरी या जिल्ह्यांमध्ये संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेला या कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आले आहे. उर्वरित जिल्ह्यांत संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेतंर्गत वाटपाचे निश्चित प्रमाण दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या अल्पसंख्याक समुदायाच्या लोकांसाठी तोपर्यत निर्धारित करणयत येईल. जोपर्यंत या जिल्ह्यांत राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कार्यक्रमांतर्गत सामिल करण्यात येत नाही. सोबतच वाटपाची निश्चित टक्केवारी अशा गावांमध्ये पायाभूत सुविधा प्रदान करण्यासाठी निर्धारित करण्यात येईल. ज्यामध्ये अलपसंख्याक समुदायाची लोकसंख्या जास्त आहे.

**८. तांत्रिक प्रशिक्षणाच्या माध्यमातून कौशल्यवृध्दी :-**

अल्पसंख्याक समुदायाच्या लोकसंख्येचा एक मोठा वर्ग, निम्न श्रेणीच्या तांत्रिक कार्यात गुंतलेला आहे किंवा हस्तकलेतून आपला उदरनिर्वाह करत आहे. अशा लोकांसाठी तंत्र प्रशिक्षणाची व्यवस्था करून दिल्याने त्यांचे कौशल्य आणि उदरनिर्वाह क्षमता वाढते. म्हणून सर्व नव्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थापैकी काही संस्था अल्पसंख्याक बहुल भागात उघडण्यात येतील आणि उत्कृष्टतेची केंद्रे म्हणून उन्नत करण्यात येणाऱ्या विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्थेपैकी काही संस्थांचे उन्नयन त्याच आधारे करण्यात येईल.

**९. आर्थिक कार्यासाठी कर्ज :-**

(क) राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्तीय महामंडळ (राअविविम) सन १९९४ मध्ये स्थापन करण्यात आले. अल्पसंख्याक समुदायामध्ये आर्थिक विकासाशी संबंधित कामामध्ये वाढ करणे हा या महामंडळ करण्यामागचा हेतू होता. सरकार या महामंडळाला अधिक योग्य मदत देण्यासाठी वचनबध्द आहे.

(ख) स्वयंरोजगारासाठीचे प्रयत्न करणे आणि तो चालू ठेवणे यासाठी बँकेचे कर्ज आवश्यक आहे. प्राधान्य क्षेत्रासाठी एकूण बँक कर्जाचे १५ टक्के कर्ज देशातील बँकासाठी निर्धारित करण्यात आले आहे. या प्राधान्याच्या क्षेत्रात इतर बाबींसह यांचा समावेश आहे. शेतीसाठी कर्ज, लघुउद्योग व छोट्या कामधंद्यासाठी कर्ज, किरकोळ व्यापार व्यवसायिक व स्वयंरोजगार करण्याऱ्या लोकांसाठी कर्ज, शिक्षणासाठी कर्ज, घरासाठी कर्ज व इतर लघु कर्ज सर्व घटकांमध्ये प्राधान्याच्या क्षेत्रात येणाऱ्या कर्जाची निश्चित टक्केवारी अलपसंख्याक समुदायासाठी असले, यांची खातरजमा करण्यात येईल.

**१०. राज्य आणि केंद्रीय सेवामध्ये सेवाभरती :-**

(क) अल्पसंख्याक समाजाचा शासकीय नोकऱ्यांमधील सहभाग वाढविण्यासाठी विविध स्पर्धा परीक्षा, पोलीस भरती पूव्र प्रशिक्षण इ. प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतात. पोलिस कर्मचाऱ्यांची भरती करतेवेळी अल्पसंख्याक समुदायाच्या उमेदवारांवर विशेष विचार करावा यासाठी निवड समित्यांमध्ये प्रतिनिधीची भागीदारी असायला पाहिजे.

(ख) केंद्र सरकार सुध्दा, केंद्रीय पोलीस दलात कर्मचाऱ्यांची भरती करतेवेळी अशीच कार्यवाही अमंलात आणेल.

(ग) रेल्वे, राष्ट्रीयाकृत बँका आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाकडून मोठ्या प्रमाणावर रोजगार संधी प्रदान करण्यात येतात या बाबतीतही, संबंधित विभाग भरती करताना अलपसंख्याक समुदयाच्या उमेदवारांवर विशेष लक्ष देतील.

(घ) अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांना सरकारी व खाजगी संस्थेमध्ये शिकवणी प्रदान करण्यासाठी एक विशेष योजना सुरू केली जाईल.

(ग) अल्पसंख्याक समुदायाच्या लोकांचा जीवनमानाचा दर्जा सुधारणे.

**११.ग्रामीण गृहनिर्माण योजनेत समान वाटा.**

प्रधानमंत्री आवास योजनेत दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या लोकांच्या घरासाठी आर्थिक मदत देण्याची व्यवस्था आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत भौतिक व आर्थिक ध्येयांची निश्चित टक्केवारी ग्रामीण भागात राहणाऱ्या अल्पसंख्याक समुदायासाठी निर्धारित करण्यात येईल.

**१२.अल्पसंख्याकांच्या झोपडपट्टयांमध्ये सुधारणा :-**

एकात्मिक आवास आणि झोपडपट्टी विकास कार्यक्रम आणि जवाहरलाल नेजरू राष्ट्रीय शहरी नवीकरण कार्यक्रमाच्या योजनांतर्गत, केंद्र सरकार शहरी झोपडपट्टयांच्या विकासासाठी राज्य सरकार/ संघ राज्य क्षेत्रांना मदत देते. ज्यामुळे या वस्त्यांमध्ये सार्वजनिक सुविधा आणि मुलभूत

सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. या कार्यक्रमाचे फायदे अल्पसंख्याक समुदायाचे लोक आणि या समुदायांची जास्त लोकसंख्या असलेल्या नगरात झोपडपट्टी योग्य प्रमाणात मिळेल यांची खातरजमा करण्यात येईल

**(घ) जातीय दंगलींना आळा घालणे व त्यावर नियंत्रण मिळविणे :-**

**१३. जातीय घटनांना आळा घालणे :-**

जातीय व धार्मिकदृष्ट्या संवेदनशील आणि दंगल प्रभावित असलेल्या क्षेत्रांत अशा जिल्हा व पोलीस अधिकाऱ्यांना नेमले पाहिजे, जे अत्यंत कुशल, निष्पक्ष आणि निरपेक्ष आधिकारी म्हणून ओळखले जातात. अशा भागात आणि इतरत्र कोठेही जातीय तणाव दूर करणे, हे काम जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिक्षकांच्या प्राथमिक कार्यात सामिल असावयास पाहिजे. या बाबतीत त्यांची कामगिरी त्यांच्या बढतीसाठी महत्त्वाचा घटक असला पाहिजे.

**१४.जातीय गुन्ह्यासाठी खटले चालविणे :-**

जे जातीय दंगे भडकवितात किंवा हिंसा करतात त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई केली पाहिजे. यासाठी विशेष न्यायालय स्थापित केले पाहिजे. जेणेकरुन गुन्हेगारांना लवकरात लवकर शिक्षा मिळेल.

**१५.जातीय दंगलीत बळी पडलेल्यांचे पुनवर्सन :-**

जातीय दंगलीत बळी पडलेल्यांना लवकरात लवकर मदत दिली पाहिजे आणि त्यांच्या पुनर्वसणासाठी उपयुक्त आर्थिक मदत उपलब्ध करुन दिली पाहिजे.

( तळटीप - सदर माहिती फक्त योजनेची माहिती जनतेस उपलब्ध करुन देण्यासाठी येथे देण्यात आली आहे. या योजनेच्या अधिकृत माहितीसाठी अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाच www.minorityaffairs.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर पहावी.)